**L. C. BILL No. VIII OF 2026.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE SKILLS UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2024.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८.**

**महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक २४ मार्च २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

२०२४ चा महा. ३५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:-

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.)एचबी ३५१६–१ (३००—३-२०२६)

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या अनुसूचीची सुधारणा.

२०२४ चा महा. ३५.

**२.** महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये, भाग दोन मधील, तक्त्यामध्ये, पुढील नोंदी समाविष्ट करण्यात येतील:-

| | |
|---|---|
| “१. पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठ, लोदगा, मु. पो. लोदगा, गट क्रमांक २३८, फिनिक्स एज्युकेशनल कॅम्पस, तालुका औसा, जिल्हा लातूर-४१३ ५३१. | फिनीक्स फाउंडेशन संस्था, लातूर, नोंदणी क्रमांक महा/१८५८४/०८/ लातूर, विठ्ठल हाऊसिंग सोसायटी, चर्चजवळ, नांदेड रोड, लातूर-४१३ ५१२, येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) अन्वये नोंदणीकृत केलेली संस्था. |
| २. फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्युअरशिप विद्यापीठ, पुणे, सेक्टर ए ४, सर्वे नं. १६/१/१, फॉरेस्ट ट्रेल्स टाउनशिप, परांजपे स्कीम्स, पौड रोड, भुगाव, पुणे, महाराष्ट्र-४१२ ११५. | फ्युएल (फ्रेंड्स युनियन फॉर एनरझेयझिंग लिव्हज), नोंदणी क्रमांक इ ४९१३/ पुणे, सेक्टर ए ४, सर्वे नं.१६/१/१, फॉरेस्ट ट्रेल्स टाउनशिप, परांजपे स्कीम्स, पौड रोड, भुगाव, पुणे, महाराष्ट्र-४१२ ११५, येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (१९५० चा २९) अन्वये नोंदणीकृत केलेली संस्था.”. |

**उद्देश व कारणे यांचे निवेदन.**

महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ (२०२४ चा महा. ३५) यामध्ये, महाराष्ट्र राज्यातील कौशल्य शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठांची स्थापना, विधि संस्थापन व विनियमन करण्याची तरतूद केली आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद केली आहे की, शासन, कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने, कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे, याबाबत खात्री पटली असेल तर, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून अनुसूचीमध्ये केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोन मध्ये, खाजगी कौशल्य विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय समाविष्ट करून, त्याद्वारे खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देऊ शकेल.

३. उक्त कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की, "पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठ, लोदगा" आणि "फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्युअरशिप विद्यापीठ, पुणे" या नावाने खाजगी कौशल्य विद्यापीठे स्थापन करण्यासाठी अनुक्रमे फिनिक्स फाउंडेशन संस्था लातूर आणि फ्युयल (फ्रेंड्स युनियन फॉर एनरझेयझिंग लिव्हज) या प्रायोजक मंडळांनी कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे.

४. म्हणून, कायदा अधिनियमित करून त्याद्वारे, प्रस्तावित केलेल्या उक्त खाजगी विद्यापीठांची स्थापना करण्यास परवानगी देण्यासाठी आणि त्यामध्ये, उक्त विद्यापीठे आणि त्यांची प्रायोजक मंडळे यांचे नाव, ठिकाण व मुख्यालये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यास जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोन मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २३ मार्च, २०२६.

**मंगलप्रभात लोढा,**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री.

**सन २०२६ चे वि.प.विधेयक क्रमांक ८— महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे**

**(स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.**

**[महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन)
अधिनियम, २०२४ यातील उतारे.]**

**(सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५)**

**१.** ते **६०.** ** ** **

**अनुसूची**

**भाग एक.** ** ** **

**भाग दोन**

[कलम ६(१) पहा]

| अ.क्र.<br><br>(१) | विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालये<br>(२) | प्रायोजक मंडळाचे नाव व पत्ता<br><br>(३) |
|---|---|---|
| ** | ** | ** |
| ** | ** | ** |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८.]**

**महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. मंगलप्रभात लोढा,**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री.]

**[विधानपरिषदेने दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई